# जाहिर नोटीस

तमाम लोकांना (दुकानदार / पुरवठादार) यांना कळविणेत येते की, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग या कार्यालयाच्या अंतर्गत कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यासाठी विधी सेवांच्या माहितीचा प्रचार व प्रसार करणेसाठी वेगवेगळे बॅनर्स तसेच होर्डिंग्ज लावावे लागतात. कार्यक्रमांच्या ठिकाणी विधी सेवांच्या माहितीचा प्रसार व प्रचार करोसाठी तालुका विधी सेवा समिती कुडाळ, दोडमार्ग, मालवण, वेंगुर्ला, सावंतवाडी, कणकवली, देवगड या समित्यांसाठी प्रत्येकी एक स्टॅण्डी (Standee) व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग या कार्यालयासाठी दोन स्टॅण्डी (Standee) खरेदी करणेसाठी याव्दारे दरपत्रके मागविणेत येत आहेत.

दरपत्रके सादर करताना बंद लखोटयातून सादर करणेत यावीत तसेच लखोटयावर "स्टॅण्डी (Standee) साठीची दरपत्रके" असा उल्लेख करणेत यावा.

दिनांक २०/०१/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत बंद लखोटयातून सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांचे नांवे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग, "विधी सेवा सदन" इमारत, जिल्हा न्यायालय इमारतीचे शेजारी, सिंधुदुर्गनगरी येथे सादर करावयाची आहेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक – १३.०१.२०२४

अधीक्षक,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
सिंधुदुर्ग.

म.जा.क्र.११८ सन २०२५
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग
दिनांक १३.०१.२०२५

शाखा
दाखल दिनांक
पराठी आवक क्र.
अधीक्षक (प्रशासन)
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस

प्रत माहितीसाठी व नोटीस बोर्डवर प्रसिदध करणेसाठी –

१. मा. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), सिंधुदुर्ग
२. मा. मुख्य न्यायादंडाधिकारी, सिंधुदुर्ग
३. मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड व दोडामार्ग.

प्रत माहितीसाठी व नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी व जिल्हा न्यायालयाचे संकेत स्थळावर प्रसिध्द करणेसाई मा. प्रबंधक, जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांसकडे रवाना.